णधन्यधन्य ॥ ३॥ धन्यहेंगोकुळधन्यहेगोपाळ ॥ व्रजवासी
सकळधन्यधन्य ॥ ४ ॥ धन्यहीयशोदास्तनदेमुकुंदा ॥ ध
न्यतूंचिनंदात्रैलोक्यांत ॥५॥ ब्रह्मसनातनवेदांसीनकळे॥
गड्यांसंगेंखेळेअरण्यांत ॥ ६ ॥ विश्वाचाजोबापनंदत्याचा
पिता ॥ यशोदेसीमाताह्मणतसे ॥ ७ ॥ सद्गदितकंठने
त्रींजळवाहे ॥ नामाम्हणेकायमागतसे ॥ ८ ॥

॥ अभंग ॥ १०६ ॥

इतुकेंमागतसेंतुज॥वनींजन्मदेईंमज॥१॥सुखेंकरोनीराही
न ॥ तुझेपाहीनचरण ॥२॥ बहूतशीणलों॥ आतांतुजपासीं

आलों॥३॥नकरींआव्हेर ॥ दासतुझामीकिंकर ॥ ४ ॥ येतों काकुळती ॥ नामाह्मणेदेवाप्रती ॥ ५ ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १०७ ॥

कायदेसीलयांजला ॥ ब्रह्माह्मणेनकळेमला ॥१॥ ह्मणसीदेईनमीमुक्ती ॥ तरीऐकारमापती॥२॥ मारायासीआले॥त्यांसिस्वरूपींमिळविले ॥३॥नफिटेयाचेंपुण्य ॥ तुजवरीझालें ऋण ॥४॥येथोनियांनवजासी ॥ मजकळलेंमानसीं ॥ ५॥ आणोनीयांदेत ॥ गाईगोपाळसमस्त ॥६॥घालींपोटामध्यें डोई ॥ क्षमाकरींमाझेआई ॥७॥ आज्ञाघेऊनियांगेला ॥ नामाह्मणेस्वस्थळाला ॥ ८ ॥ ।छ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १०८ ॥

आनंदेंखेळत॥रामगडीकृष्णनाथ ॥ १ ॥ गडीह्मणतीरामा॥ ताडफळेंदेईआह्मा॥२॥सकळमिळोनी॥आलेधेनूकाचेवनीं ॥३॥वृक्षहालवोनी ॥ फळेंपाडीतीमेदिनी ॥ ४ ॥ येतधांवोनीअसुर ॥ करीतयाचासंहार ॥५॥ भक्तांचाअंकित॥नामाह्मणेकृष्णनाथ ॥ ६ ॥ छ छ

॥ अभंग ॥ १०९ ॥

कालिंदीचेडोहींकाळियाचीवस्ती ॥ऐकपरीक्षितीचरित्रहें॥ १ ॥ पक्षीश्वापदांनींसांडीयेलेंस्थळा ॥ निघतातिज्वाळातयाडोहीं ॥ २ ॥ विषाचियायोगेंझाडेंजळताती ॥ जीवननघेतीकोणीत्याचें ॥३॥ वैकुंठनायकतयावनींआला॥ गोपाळांचामेळाबरोबरी॥४॥हुतुतुहमामाखेळखेळताती॥देवासीह्मणतीलपेंआतां ॥५॥ तृषाक्रांतगाईजाहलेगोपाळ ॥ पितीतेव्हांजळकाळियाचें ॥६॥ लहानालींमुलेंनाहींतयांज्ञान ॥



झालेगतप्राणसकळांचे ॥७॥नामाह्मणेतेव्हांकृपादृष्टींपाही ॥ उठवीसमस्तगाईआणिगडी ॥ ८ ॥ ॥

॥ अभंग ॥ ११० ॥

जगजेठीतेव्हांक्रोधावलाचित्तीं ॥ करीनमीशांतीतुझीआतां ॥१ ॥ माझीयालेंकरांदीधलासेत्रास ॥ करीनमीनाशआतां तुझा ॥२॥ त्रैलोक्यांतकोणऐसाहोसमर्थ ॥ माझेशरणागत मारीलतो ॥३॥ माझीयाभक्तांसीजोकांदुःखदाय ॥ करीन प्रळयत्याजवरी ॥४॥ स्फुरतातीदंडकांपतीअधर ॥ उठला सत्वरजगदीश ॥ ५ ॥ कळंबाचेवृक्षींदेवचढतसे ॥ पीतांबर गोसेखोवीतसे ६ जगद्गुरूतेव्हांपुष्पमाळाकाढी॥टाकीतसे उडीजळामध्यें ॥७॥ नामाह्मणेशोकेंव्यापिलेसमग्र ॥ करो नीएकाग्रमनऐका ॥ ८ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १११ ॥

घालीतसेवेढेदीसतसेजळीं॥आकांतसकळींमांडीयेला ॥१ गडीरडतातीवत्सपडताती ॥ कपाळेंपीटीतीसकळीक॥२॥ तुजवांचूनीयांरक्षीकोणआह्मां॥कायसांगूरामासकळीक॥३ रुसल्याआमुचेंकरीसमाधान ॥ तुजविणवनओसवाटे ॥४ आह्मांसाठींतुवांदुष्टांसीमारीलें ॥ कोणआतांलळेपुरवील ॥५॥ तुजवांचूनीयांआह्मीसर्वदीन ॥ नजाऊंयेथूनगोकुळा सी ६ वियोगानेंतेव्हांपक्षीरडताती॥ आतांकृष्णमूर्त्तीकैंची आह्मां॥७॥बोलोनीयांऐसेंनिस्तेजपडती ॥ नदीवाहातातो स्थीरावली ॥८॥ नामाह्मणेहोतीदुश्चिन्हेंबहुत ॥ गोकुळींस मस्तविचारीती ॥ ९ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ ११२ ॥

यशोदाव्याकूळजाहलीसेप्राणें ॥ सुखीअसोतान्हेंवनामाजी॥१॥उठतीतिडकास्तनींमाझ्याफार ॥ लवतसेनेत्रवेळोवेळां ॥२॥ जीवतळमळीदाटेमाझाघसा ॥ पाहीनपाडसाकेव्हांमाझ्या ॥३॥ गोकुळींचेजननिघालेसकळ॥पहातीगोपाळवनामध्यें ॥४॥कालिंदीच्यातीरींपडलेसकळ॥पाहोनीकोल्हाळकरीताती ५ कपाळेंपीटीतीयशोदारोहिणी॥आतांचक्रपाणीकैंचाआह्मां ॥६॥ धांवधांवकृष्णादावींरेवदना॥पाजूंआतांपान्हांकोणालागीं॥७॥तुझियाकौतुकेंकंटींमीसंसार॥जळतेंअंतरतुजसाठीं ॥८॥ कोणावरीआतांघालूंअळंकार॥बुडालेंहेंघरमाझेंआतां ॥९॥ नामाह्मणेशोकेंजाऊंपाहेप्राण॥सकळांचेंजीवनकृष्णनाथ ॥ १० ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ ११३ ॥

नंदह्मणेमाझेंबुडालेंजाहाज॥अभाग्यासीमजकृष्णकैंचा॥१ कायमाझेंतपसंपूर्णसरलें॥ह्मणोनिबुडालेंतान्हेंमाझें ॥ २ ॥ चिंतेनेंव्याकुळपिटीवक्षस्थळा॥दावारेसांवळाप्राणमाझा ॥ ३॥आलीयाअतीतात्रासेंदवडीलें ॥ह्मणोनीबुडालेंबाळमाझें ४प्रातःकाळींपाहूंकोणाचेंहोमुख॥येथूनीयांसुखनाहींनाहीं ॥५॥ समस्तांचीदृष्टीकरीतुजकष्टी॥ह्मणोनीजगजेठीटाकीयेलें ॥६॥गोकुळींचेंजनदेऊंपाहेप्राण॥वांचायाकारणकायआतां॥७॥अभयदेतसेबाळिभद्रसर्वांसी॥मारूनीदुष्टासीयेईलआतां ॥ ८॥ अंतर्यामींजाणेजनझालेवेडे ॥ नामाह्मणेवेढेकाढीतसे ॥ ९ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ ११४ ॥

तयाचेमस्तकींनाचेनारायण ॥ आरंभीगायनजगदीश ॥ १ ॥ त्रैलोक्याचाभारघालीहृषीकेशी ॥ दमीतदुष्टासीस्वामीमा झा ॥ २ ॥ होतांएकक्षणझालातेव्हांक्षीण ॥ जाऊंपाहेप्राणका ळीयाचा ॥ ३ ॥ तेव्हांत्याच्यास्त्रीयायेतीकाकूळती ॥ लक्षुमी च्यापतीकृपाळुवा ॥ ४ ॥ यज्ञेशाअच्युतागोविंदामाधवा ॥ दयानिधीकेशवाकृष्णनाथा ॥ ५ ॥ श्रीधरावामनाअगावासु देवा ॥ ऐकावीहीदेवाविज्ञापना ॥ ६ ॥ आह्मांलागींआतां देईचुडेदान ॥ धरितीचरणदेवाजीचे ॥ ७ ॥ दीनांचादयाळ दासांचाकैवारी ॥ नामाह्मणेहरीउतरला ॥ ८ ॥ ॥

॥ अभंग ॥ ११५ ॥

शहूंनकायेथेंजावेंसमुद्रासी ॥ सांगेहृषीकेशीसकळीकां ॥ १ ॥ तुझीयामस्तकींअसतीचरण ॥ नभक्षीचजाणपक्षीराज ॥ २ ॥ दिव्यसुमनाच्याघालितातीमाळा ॥ पूजीतीसांवळाबापमा झा ॥ ३ ॥ अनर्घ्यरत्नांचेदेतीअळंकार ॥ श्रीमुखसुंदरपाहा ताती ॥ ४ ॥ जांबूनदताटींघालीतीभोजन ॥ निघतीतेथू नसकळीक ॥ ५ ॥ आलाभगवानआनंदलेगडी ॥ उभा रीतीगुढीजनतेव्हां ६ ॥ काळियाआख्यानस्मरेजोमानसीं ॥ नडंखीतयासीसर्पकुळ ७ अहर्निशींयाचेंकरीजोपठण ॥ ना माह्मणेविघ्ननाहींतेथें ॥ ८ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ ११६ ॥

आलावनमाळी ॥ मगभेटतीसकळी ॥ १ ॥ यशोदारोहिणी ॥ पोटींधरितीचक्रपाणी ॥ २ ॥ गाईधांवताती ॥ कृष्णअंगातेंचा

टिती ॥ ३ ॥ उड्यामारीताती ॥ गडीआनंदेंनाचती ॥ ४ ॥ नवर्णवेतोआनंद ॥ नामयाचीबुद्धीमंद ॥ ५ ॥ ॥ ७ ॥

॥ अभंग ॥ ११७ ॥

झालाअस्तमानतेथेंचिराहती ॥ ऐकेंपरीक्षितीअद्भुतत ॥ १ ॥ निद्रेनेंव्यापिलेंअसेतेव्हांसर्वां ॥ लागलावेणवातयावनीं ॥ ॥ २ ॥ गाईपळतातीपक्षीरडतातीं ॥ पिलेंपडतातीकृष्णापुढें ३ हाहाकारझालाधांवधांवकृष्णा ॥ वांचवींरेप्राणांसकळांच्या ४ तुह्मींआह्मीबाळेंवांचवींरेआह्मां ॥ धांवधांवरामाह्मणताती ॥ ५ ॥ आक्रोशेंरडतीमारितातीहाका ॥ वैकुंठनायकारक्षीं आह्मां ॥ ६ ॥ दीनांचादयाळमनाचाकोमळ ॥ घालीअग्निज्वाळमुखामध्यें ॥ ७ ॥ होतांप्रातःकाळसकळउठीले ॥ नामाम्हणेआलेगोकुळांत ॥ ८ ॥


॥ अभंग ॥ ११८ ॥

दुष्टदुराचारी ॥ गोपाळाचावेषधरी ॥ १ ॥ दैत्यओळखिला ॥ रामेंप्रलंबमारीला ॥ २ ॥ देवकारितीजयजयकार ॥ पुष्पंवर्षतीअपार ॥ ३ ॥ सूर्यआलासेमाध्यान्हा ॥ देवाबाहातीभोजना ॥ ४ ॥ नामाह्मणेपाचारिती ॥ गडीएकत्रबैसती ॥ ५ ॥

॥ अभंग ॥ ११९ ॥

एकेठायींकरुनीअन्न ॥ हातेंवाढीनारायण ॥ १ ॥ हेंपाहोनिसुरवर ॥ चित्तींकरितीविचार ॥ २ ॥ धन्यपुण्यगौळीयांचें ॥ आह्मांअन्नमिळेकैंचें ॥ ३ ॥ एकअसेयुक्ती ॥ हातधुईलश्रीपती ॥ ४ ॥ उच्छिष्टाचेमीसें ॥ देवजळींहोतीमासे ॥ ५ ॥ हेंकळलेंघननीळां ॥ सांगतसेहोगोपाळां ॥ ६ ॥ चलावृंदावनाजाऊं ॥ नामाह्मणेउदकघेऊं ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥




गोपी
वस्त्रहरण

॥ अभंग ॥१२०॥

तृणाचियालोभेंगाईगेल्यादूरी॥पाचारीमुरारीनामेंत्यांचीं१
चंद्रभागेगंगेभागिरथीयमुने ॥ येईताम्रपर्णेधांवोनीयां॥२॥
सरस्वतीप्रवरेकालिंदीनर्मदे ॥ येईतुंगभद्रेधावोनीयां॥३॥दे
वाजीचाशब्दऐकोनीयांकानीं॥येतातीधांवोनीनामाह्मणे४

॥ अभंग ॥ १२१ ॥

त्रिभंगीदेहुडेंउभेवृंदावनीं॥वेणूचक्रपाणिवाजवीतो॥१॥ त
यावरीगाईटाकितातीमाना ॥ बाळेंस्तनपानाविसरती॥२
सर्पआणिनागमुंगुसेंबैसती ॥जळेंहीवाहातींविसरलीं ॥३॥
हस्तिसिंहएकेटायींबैसताती॥भ्रमरभुलतीवेणुनादें॥४॥विं
चरीतांवेणीतेथेंराहेफणी॥करीतांभोजनींग्रासमुखीं ॥५॥उ
दकाचेकुंभगोपिकांचेशिरीं॥यमुनेचेतीरींवेडावल्या ॥६॥जा
हलेतटस्थात्रिलोकींचेजीव॥विसरलाशिवदेहभावा ॥७॥ना
माह्मणेव्योमींउभ्यादेवांगना ॥पाहोनीयांकृष्णाभुलताती

॥ अभंग ॥ १२२ ॥ ॥८॥

मार्गशीर्षमासींकात्यायनीव्रत ॥ कुमारीसमस्तआचरती१
अरुणोदयींयेतीकालिंदीचेतीरीं ॥ गातीत्यासुंदरीकृष्णजी
ला२सिकतेचीमूर्तीकरुनीदेवीची॥पूजाआर्चातीचीकरीता
ती॥३॥जोडोनियांकरकरीतीस्तवना॥ ऐकेंविज्ञापनाआदि
माये ॥४ ॥ नंदाचानंदनदेईआह्मांपती ॥ नामाह्मणेयेती
स्वस्थळासी ॥ ५ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥१२३ ॥

कालिंदीचेतीरींवस्त्रेंठेविताती॥जळांतरीघतीसकाळिक॥१॥
गड्यांसमवेतआलातेथेंकृष्ण ॥ करावयापूर्णव्रतत्यांचें॥२॥

वस्त्रेंघेवोनीयांचढेवृक्षावरी॥घाबरल्यानारीपाहोनीयां ॥ ३॥
वस्त्रेंदेईंआतांआम्हुचींमुकुंदा ॥ जावोनीयांनंदासांगूंआतां
॥ ४ ॥अच्युताअनंताकृष्णागरुडध्वजा॥दासीआह्मीतुझ्या
सकाळिका॥५॥वाजतसेशीतजाऊंपाहेप्राण॥यशोदेचीआण
तुजअसे ॥६ ॥ ऐकोनीयांऐसेंनामाह्मणेहांसे ॥ धर्मसांग
तसेतयांलागीं ॥ ७ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १२४ ॥

नग्नहोवोनीयांस्नानजेकरीती ॥ त्यांचींव्रतेंहोतीनिरर्थक॥१
त्वरेंकरोनीयांयावेंमजपासीं॥सांगतोंतुम्हासीप्रायश्चित्त॥२
एकीआडएकगुह्यस्थानींहात ॥ आनंदबहुतमनामध्यें॥३
करानमस्कारसांगेवनमाळी॥एकहस्तभाळींलाविताती॥४
देवद्विजांऐसाकारितांनमस्कार ॥पापयाचेंफारधर्मशास्त्रीं ॥
५ ॥ऐकोनीयांऐसेंलज्जासोडोनीयां ॥ पडतातीपायांआदि
त्याच्या ॥ ६ ॥ वस्त्रेंदेततेव्हांतयांजगज्जीवन ॥ मनोरथपू
र्णकरीनमी॥७॥नामाह्मणेयेतीगोकुळासीनारी ॥ चालिला
श्रीहरीतेथूनीयां ॥ ८ ॥ ॥

॥ अभंग ॥ १२५॥

प्रातःकाळींसांगेसकळांश्रीकृष्ण ॥नकाघेऊंअन्नआजकोणी
सोडोनीयांगाईचालिलेवनासी, गडीहृषीकेशीखेळताती२
वर्जीयेलेंआह्मांनकाघेऊंअन्ना ॥ खावेंकायकृष्णाआजीआ
तां ॥३॥ गडीयांसीसांगेवैकुंठींचाराणा॥सांगावेंब्राह्मणाजा
वोनीयां ॥४॥ वनींउपवासीआहेरामकृष्ण ॥ द्यावेंत्यासी
अन्नकृपाकरोनी ॥५॥ गोपाळांसीतेव्हांधाडीवासुदेव ॥ पा
हावयाभावयाज्ञिकांचा ॥६ ॥ जोडोनीयांहातवंदीतीद्विजां

सीं ॥ धाडिलेंआह्मांसीकृष्णनाथें ॥७॥ नामाह्मणेऐसेंसांग
तीगोपाळ ॥ याज्ञिकांसबळअभिमान ॥ ८ ॥ ॥ ७॥

॥ अभंग ॥ १२६ ॥

पडेप्रायश्चित्तबोलूंनकाकोणी ॥ ऐकूंनयेकानींशब्दयांचा ॥
॥१॥स्वर्गसुखासाठींकरीतातियज्ञ ॥ टाकितीअवदानअग्नि
मुखीं॥२॥भोक्तावनींआलानकळेचीत्यांला॥पूर्णब्रह्मयाला
नजाणती ॥ ३ ॥ कृपाळुबहुतपरीक्षितीराया ॥ उद्धारकरा
यापाठवीलें ॥ ४ ॥ इच्छामात्रेंपाडीअन्नाचेपर्वत ॥ काकुळ
तीयेतअन्नासाठीं ॥ ५ ॥ गडीयांसीकळेतेथीलआकार॥ नि
घतीसत्वरतेथूनीयां ॥ ६ ॥ येऊनीयांकृष्णासांगीतलेंत्यांनीं
॥ हांसेचक्रपाणीनामाह्मणे ॥ ७ ॥ ॥७॥

॥ अभंग ॥ १२७ ॥

कृष्णापांचखाणीऊथळादिसती ॥लाहानाल्याभिंतीत्याजव
री॥१॥विस्तूघालीतातीगवतआंथरती ॥बडबडकरीतीअव
घेजण॥२॥घालूनीयांतूपहातींघेतीचाटू ॥ करीतीॐफटूअ
स्कावेळ॥३॥लांकडाचेंपाळेंघेऊनीबैसला॥मिळालासेमेळा
त्याजपुढें॥४॥येवढेसेंभांडेंतांदुळसिजविती ॥ तुजलाकाय
देतीत्यांतूनीयां ॥ ५ ॥ घडिघडिऊठतीघडिघडीबैसती ॥तें
कायश्रीपतीआह्मांसांग ॥ ६ ॥ कायचतुराईअसेत्यागो
पाळां ॥ भावासीभुललानामाह्मणे ॥७॥ ॥ ७ ॥

॥ अभंग ॥ १२८ ॥

गडीयांसीतेव्हांसांगीतलेंदेवें,स्त्रीयांसीसांगावेंजाऊंनीयां१
नकोकृष्णाद्विजआह्मांसिमारिती ॥अभयश्रीपतीत्यांसीदे
त२त्वरेंकरोनीयांगेलेस्त्रियांपासी,सांगीतलेंत्यांसीवर्त्तमान

३ऐकोनीयांऐसेंऊठिल्यासत्वर,वर्जीतीभ्रतारतेव्हांत्यांचे
एकाब्राह्मणानेंस्त्रियेसीबांधीलें ॥ प्राणांसीसोडीलेंपरी
तीं५सुकुमारसांवळाराजीवलोचन ॥पहातातीकृष्णमुख
व्हां६आनंदाचेंनेत्रींवाहातेंजीवन॥पुसेवर्त्तमाननामाह्म

॥ अभंग ॥१२९॥ ॥ ७

घराजावेंऐसेंसांगेपुरुषोत्तम ॥ ऐकोनीयांश्रमफारहोय॥१
दयानिधीऐकेंअगामेघश्यामा ॥ धाडूंनकोआह्मांयेथून
यां ॥ २ ॥ तुजसाठींआह्मींसोडीलेभ्रतारां ॥ चरणींदे
थारादेवराया ॥ ३ ॥ देवनासंसारआह्मांझालेंकृष्णा
सांगावेंहेंकोणादुःखआतां ॥ ४ ॥ तुमचेभ्रतारवंदीतीतुह्मा
सी ॥ सांगेहृषीकेशीभिऊंनका ॥ ५ ॥ सांगतांचीऐसेंच
लिल्यात्यासर्व ॥ पाहातीकेशववेळोवेळां ॥ ६ ॥ द्विजांचे
मानसींहोयअनुताप ॥ निंदितातीआपआपणातें ॥ ७ ॥
भोजनकरोनीगडीरामकृष्ण॥निघतीतेथूननामाह्मणे ॥८॥

॥ अभंग ॥ १३० ॥

इंद्राचाविभागभक्षीचक्रपाणी॥रूपगोवर्धनींधरोनीयां ॥१॥
क्रोधावलाइंद्रगोळीयांनिंदित,दावीनसामर्थ्यतुह्मांआतां२
पोरांच्याबुद्धीनेंवर्ततातीसर्व॥धरूनीयांगर्वतेंचीकरी ॥३॥प्र
ळयमेघांच्याकाढील्याशृंखळा॥वर्षावेंगोकुळाजावोनीयां४
आज्ञाह्मणोनीयांवंदीयेलाइंद्र॥कोपेंजैसारुद्रप्रळयींचा ॥५
मुसळाच्याधारामेघवर्षताती॥गारापडतातीशिळांऐशा ॥६
मरतातीपक्षीश्वापदेंअपार॥हिंवेंनारीनरकांपताती॥७॥ना
माह्मणेगाईहंबर्डाहाणीती॥येऊनीपडतीकृष्णापुढें ॥ ८ ॥



॥ अभंग ॥ १३१ ॥

काकुळतीयेतीसकळीकलोक॥पाहासीकौतुककायआता १
मागेंबहुपरीराक्षियेलेंआह्मां॥अगापुरुषोत्तमादीनबंधू ॥२॥
कोणतुजविणआह्मांसीरक्षिता॥उदाराअनंताजगजेठी॥३
शरणशरणअगावासुदेवा॥अच्युतामाधवादीनबंधू ॥ ४ ॥
विलंबकरीतांजातीलरेप्राण॥धरितीचरणनामाह्मणे ॥५॥

॥ अभंग ॥ १३२ ॥

सकळिकांतेव्हांदेवेंआश्वासिलें ॥ इंद्रेंहेंमांडिलेंविघ्नयेथें॥१
महेंद्राचारंककरीनक्षणांत॥पाहापुरुषार्थदावीनमी॥२॥रक्ष
णारयांसीआहेंमीगोविंद॥उतरीनमदतुझाआतां ॥३॥ शर
णागतामारीकोणऐसाथोर॥मशकपामरपाहूंआतां ॥४॥या
साठीकरीनसृष्टीचाउभारा॥लागोनेदींवारादुःखाचामी ५
गोवर्धनातुह्मीचलारेसकळ॥दावीतोंमीबळइंद्राआतां ॥६॥
उचलिलागिरीप्रथमअंगुळी॥नामाह्मणेवळीबापमाझा ॥७

॥ अभंग ॥ १३३ ॥

राहायाजतळींआनंदेंकरूनी॥मानूंनकामनींभययाचें॥१॥
पाहूंकितीदिसपडतोपाऊस॥धरीनानिःशेषप्रळयांत॥२॥सां
गतांचीऐसेंराहातीसकळ॥वर्णितातीबळपरस्परें ॥३॥ सौंग
डेह्मणतीपडेलअवचित ॥ लावाकींरेहातसकळीक ॥ ४ ॥
उगेंचीश्रमतीवाळकेंअज्ञान॥ ह्मणेनारायणकाढाहात॥५॥
सप्तदिनहोतीसांगतोयोगींद्र॥पाहावयाइंद्रयेताझाला॥६॥
अद्भुतचारित्रपाहूनगेलीभ्रांत ॥मेघांसीसांगतपुरेकरा ॥ ७ ॥
नामाह्मणेइंद्रमनींतोशंकला॥अपराधघडलासमर्थाचा॥८

॥ अभंग ॥ १३४ ॥

राहिलापाऊसनिघावेंबाहेर ॥ सांगेविश्वंभरसकळांसी ॥१॥
दीनबंधूतेव्हांठेवीपर्वतासी ॥ भेटतीदेवासिसकळीक ॥२॥
आयुष्यबहुततुजहोवोकृष्णा॥वांचविलेंप्राणासकळांच्या ३
विष्णुदासनामाओवाळूनजाय॥येगेमाझेमायभेटीदेई॥४॥

॥ अभंग ॥ १३५ ॥

वहातसेनेत्रींइंद्राचीयानीर ॥अपराधीथोरदेवराया ॥१॥क्ष
माकरींआतांअच्युताअनंता॥ अगाकृष्णनाथादीनबंधू॥२
तुझीयादासांसिदुःखम्यांदीधलें ॥भ्रांतीनेंमोहीलेंमनमाझें
॥३॥दावींतुजथोरीनकरींचसेवा॥करादंडदेवामजलागीं॥४
तूंचिमाझाबापतूंचिमाझीआई,क्षमाकृष्णाबाईकरींआतां
॥५॥दैत्यमारावयाभूतळींआलासी,भक्तांलारक्षीसीनिरंतर
६॥ जगद्गुरूमाझाधनीवनमाळी,जोडोनिअंजुळीउभाअसे
॥७॥चतुर्भुजगळांवैजयंतीमाळा,पाहातसेडोळांनामाह्मणे

॥ अभंग ॥ १३६ ॥ ॥८॥

गोविंदामाधवाकेशवावामना ॥मायातीताकृष्णातुजनमो
१॥गोवर्धनोद्धारादेवाविश्वंभरा॥निर्गुणनिराकारातुजनमो
॥२॥ जनार्दनाहरीकृपाळुहृषीकेशा॥पुराणपुरुषातुजनमो
३॥अव्यक्ताक्षेत्रज्ञाअचिंत्याकूटस्था,भुवनैकनाथातुजनमो
४॥ अनंतब्रह्मांडेंतुझीयेउदरीं॥घनश्यामाहरीतुजनमो॥५
देवरायातुझेंकोमळहृदय ॥ कृपादृष्टींपाहेंमजकडे ॥ ६ ॥ तु
झामीकिंकरआहेंवासुदेवा,अभयद्याजीवादेईआतां७नामा
ह्मणेघालीचरणासीमीठी ॥ बोलेजगजेठीस्वामीमाझा ॥८

॥ अभंग १३७॥ ॥

तुझामोडिलाम्यांयज्ञ ॥ ऐकेंतयाचेंकारण ॥ १ ॥ नकारिसी स्मरण ॥सुखारूढतुझेंमन ॥२॥ विसरलासीमज ॥ अनुग्रह केलातुज॥३॥ऐसेंसांगेनारायण॥ नामाह्मणेसमाधान॥४॥

॥ अभंग ॥ १३८॥

आणूनिसुरभीकरीअभिषेक॥ येतीसकळीकमरुद्गण ॥ १ ॥ सुरवरांचीदाटीकरितीनमस्कार॥होतसेअपारपुष्पवृष्टी २॥ वेदमंत्रघोषऋषीकरितातीं॥अप्सरानाचतीथईथयां॥३॥ना रदतुंबरगंधर्वगायन॥वर्णितातीगुणकृष्णजीचे ॥४॥ यथावि धीइंद्रपूजीविश्वंभर॥जोडोनीयांकरउभाराहे ॥५॥ आज्ञाघे ऊनीयांजायस्वस्थळासी ॥ येतीगोकुळासीसकळीक ॥ ६॥ चरित्रजोकोणीउच्चारीलवाचे॥जळतीपापाचेपर्वततें ॥७॥ नामाह्मणेऐसेंसांगतसेशुक ॥ सूतपुराणिकशौनकासी॥८॥

॥ अभंग ॥ १३९ ॥

अहर्निशींकंसबैसेचिंताक्रांत॥विचारपुसतप्रधानांसी ॥१॥ प्रतिज्ञाकरोनिशत्रुवधाजाती॥तेमागेंनयेतीपरतोनी २ आ तांपुरुषार्थीकोणपाठवावा॥तोमजसांगावानिवडोनी ॥३॥ सांगतीप्रधानधाडाअसुरासुर॥तंवतोअसुरउभाराहे॥४॥ह्म णेमृत्यूनसेमजकोणाहातीं॥द्वापारींमारुतीगुप्तझाला ॥५॥ ऐकोनीयांऐसेंआनंदमानसीं॥गौरविलेंत्यासीनानापरी ६ नामाह्मणेकाळेंबोलाविलेंत्यासी॥सत्वरवनासीयेताझाला ॥ ७॥

॥ अभंग ॥ १४० ॥

आनंदेंवनांतखेळतातीगोप॥गाईचेकळपचरताती ॥१॥ अ कस्मातदैत्यदेखतीदुरून॥ह्मणतीकृष्णा॥विघ्नथोरआलें ॥२

रुपेंतूंकान्होब्राह्मणतातीगडी॥घालीतोंघोंगडीतुजवरी ॥३
घाबरलेतेव्हांसमस्तगोपाळ॥पाहोनिघननीळबोलतसे ॥४
तुह्मीकांहींचिंतानकरामानसीं ॥ मारीतोंमीयासीक्षणामा
जी ॥५॥ राहोनीयांउभापाहातअंतरीं॥यासीमृत्युकरींको
णाचीया॥६॥वातात्मजाहातींमरणअसेयासी॥कळलेंदेवा
सीनामाह्मणे ॥ ७ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

॥ अभंग ॥ १४१ ॥

गाईगोपतेव्हांलपवोनिक्षणेक॥ जानकीनायकजाहलादेव
१आकर्णनयनहातींधनुष्यबाण,करीतसेध्यानमारुतीचें २
स्वामीचातोधांवाऐकोनीयांकानीं,हडबडिलामनींकपींद्रतो
॥३॥निघोनित्वरितवनामाजीआला ॥चरणासिलागलाप्रे
मभावें ४ ह्मणेस्वामीकांहींसेवकासिआज्ञा॥ करावीसर्वज्ञा
दयानिधी॥५॥देवह्मणेबारेकायसांगूंफार॥पैलतोअसुरयेत
आहे ६॥तुझ्याहातेंअसेतयासिमरण॥ह्मणोनिस्मरणकेलें
तुझें॥७॥तयासिजाऊनिमारावेंत्वांआतां ॥ चरणींठेऊनमा
थानिघालातो ॥८ ॥दुर्जनेंतेवेळींमारुतीपाहीला॥ ह्मणेका
ळआलाकोठोनीयां ॥९॥ धरोनीयांनर्डीकेलागतप्राण ॥ पु
नरपियेऊनवंदीतसे ॥१०॥ नामाह्मणेदोन्हीजोडोनीयांकर
॥ बोलीलाउत्तरकायआतां ॥ ११ ॥ ॥ छ॥ ॥

॥ अभंग ॥ १४२ ॥

त्रेतायुगींख्यातीकरोनीयांथोर॥ वधिलेअसुररावणादी ॥१
कोण्याहेतूस्तवपुन्हांआगमन॥सांगाकृपाकरूनदासालागीं
॥२॥ऐकोनिवचनबोलेसर्वेश्वर ॥द्वापारींअवतारआठवाहा
॥३॥तुझभेटीस्तवरूपहेंधरीलें॥दावींतेंवहिलेंकपीह्मणे॥४॥

कृष्णलीलापाहूंहेतआहेचित्ता॥दावींसीताकांतादीनालागीं॥५॥चतुर्भुजरूपदाविलेंप्रगट ॥ शिरींमोरमुगुटशोभतसे ॥ ॥६॥गुंजाहारगळांवैजयंतीमाळा॥ कासेसिपींवळापीतांबर ॥७॥नवलक्षगाईगोपाहितितुके॥खेळतीकौतुकेंकरोनीयां ८ नामाह्मणेतेव्हांस्तुतीतेंकरीत॥नकळेतुझाअंतब्रह्मांदिकां९

॥अभंग ॥ १४३ ॥

द्वापारींचीठेवसंपूर्णपाहून ॥ विनवीजोडोनकरांलागीं ॥१॥ रामरूपधरूनमजबोळवावें॥तेंरूपराहावेंहृदयामाजी ॥२॥ मनोरथत्याचाऐकोनिश्रवणीं ॥ झालाचापपाणीतात्काळीक ॥ ३ ॥ पाहोनीयांध्यानकरोनिनमन ॥ निघालातेथूनवायोसुत ॥ ४ ॥ घेवोनीयांआज्ञासेतुबंधागेला ॥ ध्यानस्थबैसलानामाह्मणे ॥ ५ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १४४ ॥

गौळीह्मणतीहृषीकेशी ॥ दावींआपुल्यास्थळासी ॥१॥ सखातूंचिकृष्णा॥आमुचीपुरवावीवासना ॥२॥ दावींवैकुंठसकळां ॥ क्षणएकपाहूंडोळां ॥ ३ ॥ नामातेथीलरहिवासी॥ आलास्थापायाभक्तांसी ॥ ४ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १४५॥

लोपतांआदित्यपडेचंद्रप्रभा॥वृंदावनींउभासुशोभीत ॥१॥ देहूडापाउलींउभातयेवनीं ॥ वेणूचक्रपाणीवाजवीतो ॥२॥ ऐकतांचिनादगोकुळींच्यानारी ॥ पाहावयाहरीनिघताती ॥ ३ ॥ भ्रतारसेजेसीटाकूनिउठती ॥ वाढीतांपंगतीनिघताती ॥ ४ ॥ स्तनदेतांबाळेंटाकिलींभूमीसी ॥ मोकळीया

केशींनिघताती ॥ ५ ॥ नामाह्मणेऐशागेल्यादेवापासीं ॥
आनंदमानसींनसमाये ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १४६ ॥

वनामध्येंकांगेआल्यातीसकळ॥विनोदेंगोपाळह्मणतसे॥१
निशीमाजीव्याघ्रफिरतातीरानीं॥जावेंसकळांनींघराआतां
॥२॥ऐकोनियांऐसेंकठिणवचन॥चाललेंजीवननेत्रींहूनी ३
वेणुनाददूतधाडीलाआह्मांसी ॥ आलीयांह्मणसीजावेंआ
तां ॥ ४ ॥ शाहाणाचतुरआहेसीनेटका ॥ वैकुंठनायकाविं
चारावें ॥ ५ ॥ कामाग्नीनेंकृष्णापीडिलोंसकळ ॥ मांडिये
लाखेळमन्मथाचा ॥ ६ ॥ एकएकनारीएकएककृष्ण ॥ क
रावयापूर्णइच्छात्यांची ॥ ७॥ प्रकृतीसीऐसाभुललागोविं
द ॥ करितीआनंदनामाह्मणे ॥ ८ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १४७॥

झालाअभिमानधन्यआह्मीआतां॥ लक्षुमीच्याकांताभोगी
तसों१ गुप्तझालातेव्हांवैकुंठनायक॥करितातीशोकसकळी
क२निघाल्यातेथूनिफिरतातीवनें॥यशोदेचेंतान्हेंधुंडावया
३॥वृक्षआदीपक्षीपुसतीतयांसी॥तुह्मींहृषीकेशीदेखीयेला
॥४॥मृगांसिपुसतीदेखीयेलाडोळां॥सांगानासांवळाकोणी
तरी॥५॥आह्मांवरीतुह्मीकायरेकोपतां॥सांगारेभगवंतापुस
तसों॥६॥ कुरवंडीकरूंसकळांचेप्राण ॥ देऊंत्याभूषणआंगा
वरील ॥७॥ नामाह्मणेजेथेंअसेअभिमान ॥ तेथेंनारायण
नाहींनाहीं ॥ ८ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥

॥ अभंग ॥ १४८॥

ऐकावेंचरित्रपरीक्षितीराया ॥ बरोबरीजायाएकअसे ॥ १॥

ताडोनीयांपुष्पेंकरीअळंकार॥घालीतश्रीधरतीजवरी ॥२॥
नयेक्षणभरीयोगीयांचेध्यानीं॥घालीतसेवेणीआवडीनें ३॥
वंदीयेलीशिवेंचरणींचीगंगा॥करीतसेभांगांनीटतीच्या॥४॥
गोपीकांच्यावेषेंप्रगटल्याश्रुती॥गुह्यतुजप्रतीसांगीतलें ॥५॥
घेवोनीयांतीांसिगेलाकुंजवना॥वज्रांकुशाचिन्हांउमटती ६॥
गोपिकांचामेळायेतसेतांतडी॥युगाऐसीघडीझालीतयां७॥
नलगेचिशोधशीणतीसकळा॥नजातीगोकुळानामाह्मणे८॥

॥ अभंग ॥१४९॥

चंद्राच्याप्रभेनेंचमकतीपाउलें॥दुरोनिदेखिलेंगोपिकांनीं १
कृपणाचेंधनहोतेंजेंचळलें ॥ तयासिलाधलेंअवचितां॥२॥
एकिमागेंएकधांवतांतीनारी ॥आहेयेथेंहरीऐसेंवाटे ॥३॥घे
ऊनीयांरजलावितातीभाळा॥पाहातीसकळान्याहाळूनी ४
बरोबरीनारीकोणीतरीअसे॥पाउलांचेठसेउमटले ॥५॥ पा
पिणीगेतुह्मीआह्मीसकळीका,पुण्याचीअधिकाह्मणोनिभो
गी६ बरोबरीतीसींहोयअभिमान॥झालासेस्वाधीनमाझ्या
देव ॥७॥ कडेघेसीतरीयेतेंबरोबरी॥चालवेनाहरीमजआतां
८॥ जाणोनिअंतरठकविलेंभगवंतें॥नामाह्मणेतेथेंरडतसे९

॥ अभंग ॥ १५० ॥

मागोनीयांगोपीआल्यातीजपासीं॥ कोठेंहृषीकेशीसांगआ
ह्मां॥ १ ॥टाकोनीयांगेलामजपूतनारी ॥ तेथेंचिमुरारीगुप्त
झाला २॥वैकुंठनायकाअगानारायणा॥दावींरेवदनाएकवे
ळां३कृष्णाचेंचरित्रसकळकरीती,मनरंजवितीनामाह्मणे४

॥ अभंग ॥ १५१ ॥

जोडोनीयांहातयेतीकाकुळती॥पावकृपामूर्तीआह्मालागीं

॥ १॥ अवतारघेसीदुष्टवधायासी॥येसीगोकुळासीह्मणोनी यां॥२॥पाहोनीयांतुलालक्ष्मीपातली ॥ दरिद्रेंपळालीयेथू नीयां॥३॥ सकळांसिसुखद्यावयाआलासी ॥ आह्मीवनवा सीदुःखीहोतों ॥४॥नामाह्मणेकंठींधरीयेलाप्राण ॥दाखवीं चरणदयानीधी ॥ ५ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १५२ ॥

सरोवरींकमळेंतैसेतुझेनेत्र॥त्यांहूनिविचित्रदिसताती १ कृ पाळुवाऐकेंअगाहृषीकेशी॥आह्मीतुझ्यादासीमोलावीण २ कामरूपदैत्यमारीतोआह्मांसी ॥भक्तांसिरक्षिसीकीर्तीजगीं ३॥दीनांसिरक्षिसीदुष्टांसिमारिसी ॥धर्मालास्थापिसीनिरं तर ॥४॥ घेवोनीयांशस्त्रमारावेंसकळां॥आलासेकंटाळाना माह्मणे ॥ ५ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १५३ ॥

सुकुमारसांवळेंजैसींरातोत्पळें ॥ दावींतींपाऊलेंकृष्णराया ॥ १ ॥ ध्वजवज्रांकुशपद्मतेंशोभलें ॥ दावींतींपाऊलेंकृष्ण राया ॥ २ ॥ दमोनीयांदुष्टाबाहेरकाढिलें ॥ दावींतींपाऊलें कृष्णराया ॥३ ॥ रांगतांरांगतांयमलार्जुनमोडिले॥दावींतीं पाऊलेंकृष्णराया ॥ ४ ॥ अघासुराउदरींउभेजींराहिलें॥ दा वींतींपाऊलेंकृष्णराया ॥ ५ ॥ नामाह्मणेज्यांतेंवरुणानेंपू जिलें ॥ दावींतींपाऊलेंकृष्णराया ॥ ६ ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १५४ ॥

सकळांचेंतुझ्याहातींअसेसूत्र ॥ यशोदेचापुत्रनहोसील ॥ ॥ १ ॥ नंदाचीयाऋणाफेडायाआलासी ॥ कळलेंआह्मा सीतुझ्यारूपें ॥ २ ॥ तेहेतिसकोटीदेवब्रह्मासदाशिव ॥ प्रा

थितातीसर्वेतुजलागीं ॥ ३ ॥ यादवकुळटिळकावैकुंठनाय
का ॥ विधीच्याजनकाभेटआतां ॥ ४ ॥ नामाह्मणेमुख
दावींकृष्णनाथा ॥ हरेलहीव्यथावियोगाची ॥ ५ ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १५५ ॥

शरणागततातारींभवसिंधुत्वरित ॥ ठेवावातोहातशिरावरी
॥ १ ॥ अरण्यांतदुष्टदैत्यांसिमारित ॥ ठेवावातोहातशिराव
री ॥ २ ॥ वेणुपांवाजयाहातांतशोभत ॥ ठेवावातोहातशि
रावरी ॥ ३ ॥ घेऊनिसिदोऱ्यागड्यांसिवाढीत ॥ ठेवावातोहा
तशिरावरी ॥ ४ ॥ रक्षावयाव्रजाउचलीलापर्वत ॥ ठेवावा
तोहातशिरावरी ॥ ५ ॥ सुवर्णाचींकडींभूषणेंअमूप ॥ पाहा
तांनिष्पापनामाह्मणे ॥ ६ ॥ ॥छ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १५६ ॥

अभिमानेंघालाघातलाआह्मांसी ॥ ह्मणोनिलपसीदेवरा
या ॥ १ ॥ तुजवांचोनीयांजाऊंपाहेप्राण ॥ दाखवींवदनएक
वेळां ॥ २ ॥ मुगुटकुंडलेंश्रीमुखसांवळें ॥ केशरिलाविलेंगं
धभाळीं ॥ ३ ॥ पाहोनीयांजीवींहोयफारसुख ॥ हारेलहीभू
कडोळीयांची ॥ ४ ॥ तुजवांचोनीयांआह्मानाहींकोणी ॥ तिहीं
त्रिभुवनींनामाह्मणे ॥ ५ ॥ ॥ ॥छ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १५७ ॥

चरणासिशरणतुझीयाजेयेती ॥ तेचिउतरतीभवसिंधू ॥ १ ॥
लक्ष्मीनेंज्यातेंअसेआराधिलें ॥ ठेवींतींपाऊलेंस्तनावरी २
आवडीनेंशिवेंमस्तकींवंदीलें ॥ ठेवींतींपाऊलेंस्तनावरी ॥ ३
नामाह्मणेऐसीकरितातीस्तुती ॥ शिंपीयेलीक्षीतीअश्रुपातें ४

॥ अभंग ॥ १५८ ॥

आह्मांवरीकांरेधरियेलाराग ॥ कायतुझेंसांगआह्मींकेलें ॥ १ ॥
रडतसोंआह्मीमारीतसोंहाका ॥ विश्वाच्याजनकानायकसी
॥ २ ॥ कामाग्नीनेंआह्मीजळतोंसकळ ॥ करावेंशीतळअधरामृ
तें ॥ ३ ॥ नामाह्मणेदेईएकवेळभेटी ॥ तुजसाठींकष्टीफारहोतों

॥ अभंग ॥ १५९ ॥ ॥ ४ ॥

वाजवोनिवेणूपसारिलेंजाळें ॥ आह्मासिनकळेकपटीयातूं १
दुखवोनिसर्वांटाकीयेलेंवनीं ॥ गेलासिवधूनिपारधीया ॥ २
धरोनीयांधीररराहूंएकक्षण ॥ देऊंमगप्राणसकळीक ॥ ३ ॥ स
कळांच्याहत्यायेतीतुजवरी ॥ नामाह्मणेहरीभेटआतां ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ १६० ॥

त्रिविधतापेंजेहोतातीसंतप्त ॥ शीतळकरीतकथामृत ॥ १ ॥ अ
मृतापरीसकथातेअधीक ॥ सांगतसेएकदेवराया ॥ २ ॥ स्वर्गीं
जेअमृतप्राशनकारेती ॥ पुण्यसरल्यायेतीमृत्युलोका ॥ ३ ॥ तु
झीकथादेतअच्युतपदासी ॥ नाविचारीमानसींयातीकांहीं ४
नाहींचतुराईबोबडेहेबोल ॥ लिहितविठ्ठलनामाह्मणे ॥ ५ ॥

॥ अभंग ॥ १६१ ॥

गाईघेऊनीयांजातीजेव्हांराना, आमुचीयामनादुःखवाटे १
सुकुमारसांवळींजैसींरातोत्पळें ॥ त्याहूनिकोंवळेपायतुझे २
खडकांटेबहुकठिणतृणमुळें ॥ ठेविसीपाऊलेंतयांवरी ॥ ३ पा
वतोसीक्लेशअगावासुदेवा ॥ ह्मणोनीयांजीवादुःखवाटे ॥ ४ ॥
सांगतसोंआह्मीनित्ययशोदेसी, धाडूंनकोयासीवनामध्यें ५
नामाह्मणेहोयसकळांचाउद्धार ॥ ह्मणोनिश्रीधरवनाजाये ६

॥ अभंग ॥ १६२ ॥

तुजवांचोनीयांवैकुंठनायका॥आह्मांसिघटिकायुगहोय ॥१
अस्तमानहोतांयेसीतूंगोकुळीं॥मुखावरीधूळीगोरजाची॥ २
कुरळहेकेशसुंदरनासिक॥पाहोनीयांसुखफारहोय ॥ ३ ॥ ल
वतीपापण्यानसोसतीआह्मां॥अहर्निशींनामाहेंचिगाय ४

॥ अभंग ॥ १६३ ॥

टाकीयेलेंआह्मीपतिबंधूसूतां॥आलोंतअच्युतातुजपासी१
आमुचीहीइच्छाकरिसीलपूर्ण॥आहेसीकठिणठावेंनाहीं२
घालोनीयांकूपींकापियेलेंदोरा॥साधीयेलेंवैराआपुलीया ३
वरोनीयांटाकींमोठासापर्वत॥ह्मणतीसमस्तनामाह्मणे ॥४

॥ अभंग ॥ १६४ ॥

तुझेभेटीविण॥जातीसकळांचेप्राण ॥१॥ दयातुझ्यामना ॥
कांरेनयेनारायणा ॥२॥ बोलवेनाआतां ॥ कंठशोषलाअनं
ता ॥३॥ ऐसेंपाहोनीयां ॥ नामाह्मणेआलीदया ॥४॥ ७॥

॥ अभंग ॥ १६५ ॥

देतसेदर्शन॥सकळांसीनारायण॥१॥झालासकळांआनंद ॥
हृदयींधरिलागोविंद॥२॥ टाकोनीयांआह्मां॥कांगेलासीपुरु
षोत्तमा॥३॥तुह्मांझालाअभिमान॥नामाह्मणेसांगेखूण ॥४

॥ अभंग ॥१६६॥

सकळांचीइच्छाकरीतसेपूर्ण॥भुललाश्रीकृष्णत्यांच्याभावा
१विमानींबैसोनीसुरवरपाहाती॥गंधर्वगातातीसप्तस्वरें॥२
वीणेवाजतातीमृदंगांचेघोष॥वाचेतोउल्हासवर्णवेना ३ न
जायचंद्रमानजातनक्षत्रें ॥ पाहातीसर्वत्रेंरासक्रीडा॥४॥ज
लक्रीडाकरीलक्ष्मीचापती॥लाळघोंटितातीदेवस्त्रिया ॥५॥

धन्यत्यागोपिकाधन्यत्यांचेपुण्य,भोगितातीकृष्णपूर्णब्रह्म ६
नामाह्मणेह्यायकामाचीतेमूर्त्ती॥ नव्हेवीर्यच्यूतीगोविंदाची

॥ अभंग ॥१६७॥ ॥ ७ ॥

होताप्रातःकाळसांगतसेतयां॥जावेंयेथूनीयांशीघ्रआतां॥१
क्षणक्षणापाहतीदेवाजीचेंमुख ॥ येतीसकाळिकगोकुळासी
२परीक्षितीऐकेंएकाकौतुकासी॥ होत्यात्यांजपासीत्यांच्या
स्त्रिया ॥३॥ ह्मणोनीयांकोणिनाहीं विचारिलें॥अंतरींनकळे
दुर्जीयाला ॥४॥ यथामतीरासवर्णिलादेवाचा ॥ संपूर्णहे
वाचाकायकरी ॥ ५ ॥ चरित्रश्रवणकरीलजोकोणी ॥ धन्य
तोचिप्राणीनामाह्मणे ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ॥६॥

॥ अभंग ॥ १६८॥

सरस्वतीतीरींअंबिकेचेंस्थान॥गोकुळींचेजनजातीतेथें ॥१
करोनिपूजनकरितीप्रार्थना॥नंदाच्यानंदनासुखीराखीं ॥२
सारितांभोजनलपालाआदित्य ॥ नामाह्मणेतेथेंराहातातीं

॥ अभंग१६९ ॥ ॥ ३ ॥

निद्रितसकळतयेवनींव्याळ॥गिळीतसेबळेंनंदालागीं ॥१॥
कृष्णांधांववेगींगिळीतसेसर्प ॥ काळावरीदर्पतुझादेवा॥२॥
माझीयापाडसायेईबाधांवोन ॥ दाखवींवदनअंतकाळीं॥३
आलीकायतुजनिद्रारेकान्हया ॥ माझीयातान्हयाऊठवेगीं
४ऐकोनीयांऐसेंपाहातीसकळ॥घालितीमुसळसर्पावरी ॥५
श्रमलेसकळसोडीनानंदाला ॥ पिटीबक्षस्थळानंदपत्नी ६
उठेजगद्गुरूकायझालेंमाये ॥ लावितसेपायतयालागीं॥७॥
टाकियेलेंसर्पेंतेव्हांकलेवर॥पुरुषसुंदरनिघतसे ८॥नामाह्म
णेवाचेंस्तवीविश्वंभरा ॥ करूनिनमस्काराजाताझाला॥९॥

॥ अभंग१७० ॥

करितीगायनरामकृष्णहरी ॥ गोकुळींच्यानारीजातीतेथें १ शंखनामातेथेंआलासेगुह्यक॥नाहींत्याविवेकपापियासी २ उपजलाकामत्याचीयामना॥ घालोनिविमानास्त्रियानेत ३धांवधांवरामानेतसेहाआह्मां,अगामेघश्यामाकृष्णनाथा ४॥नेतोस्त्रियाकायनकळेचिदेवा॥ यासिकरूंद्यावाअपराध ॥५॥ हातींवृक्षदोघेऐसेपाहोनीयां॥टाकोनितोस्त्रियापळत से॥६॥घालितांचिवृक्षप्राणासीमुकला॥ मणीत्याचादिल्हा बळीभद्रा ॥ ७ ॥ भक्तांसाठींमारीदुष्टांजगजेठी ॥ नामा ह्मणेत्रुटीविसरेना ॥ ८ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

॥ अभंग ॥ १७१ ॥

गोपिकांचामेळाआलाघराप्रती॥कायत्याह्मणतीनंदालागीं ॥ १ ॥ परब्रह्मसाक्षात्क्षीरसागरवासी ॥ त्याकैसाधाडिसी वनामध्यें ॥२॥ब्रह्माआणिइंद्रआलेगोकुळासी ॥ वार्णितीकृ ष्णासीतुह्मींदेखा ॥ ३॥ तेहेतीसकोटीदेवज्याप्रार्थीत॥त्या सिअरण्यांतरुपतीकांटे ॥४॥ दैत्यांचाहाभारजाहलापृथ्वी सी॥वधायाकंसासिआलायेथें५ त्याजसाठींफारश्रमताती योगी ॥ कैलासाचाजोगीध्यानकरी ॥६॥ भ्रांतीकारेतुजपडे वेळोवेळां॥पाहातोसीडोळांचरित्रास॥७॥ नामयासुक्तझा लेंअसेफार ॥ ह्मणोनिविचारनाठवेची ॥ ८ ॥ ॥

॥ अभंग ॥ १७२ ॥

वृषभाच्यावेषेंआलाअरिष्टासुर॥इंद्रादिसुरवरभीतीजया१ बहुदेतोत्रासगोकुळींच्याजना ॥ धांवधांवकृष्णामारींयाला २॥ जगजेठीतेव्हांधरीतसेशिंगें॥सारीतसेमागेंभुजाबळें ॥

३ पाडोनीयांखालीं दिलापायवरा॥मारिलाअसुरनामाह्मणे

॥ अभंग ॥ १७३ ॥ ॥ ४ ॥

कंसाचीयाघराआलानारदमुनी ॥ एकांतींबैसोनिसांगतसे ॥ १॥ सातवाजोगर्भजिरालाह्मणती॥रोहिणीप्रसवेतीबळी राम ॥ २ ॥ आठवाजोपुत्रदेवकीसिझाला ॥ वसुदेवेंनेलानंदाघरीं ॥ ३ ॥ यशोदेचीकन्याघेवो नीयांयेत॥गेलीआकाशांतमारीतांजे ॥ ४ ॥ तुझीयामानसींआशंकायेईल ॥ होतेरक्षपाळमाझेतेथें ॥ ५ ॥ ईश्वराचीमावनकळेकोणाला ॥ कळलेंमजलात्याच्याकृपें ॥६॥घेऊनीयांशस्त्रउठिलात्वरित ॥करितोंमीघातवसुदेवाचा ॥७॥ तयेवेळींह्मणेब्रह्मयाचासुत ॥ ऐकतुजमातसांगतोंमी ॥८॥ शत्रूवधींआधींमगमारींयासी ॥आहेतुजपासींकारागृहीं॥९॥सांगोनीयांऐसेंशांतविलेंत्यासी॥ गेलागोकुळासिनामाह्मणे ॥ १० ॥ ॥

॥ अभंग ॥ १७४ ॥

गोकुळायेऊनिभेटेनंदादिकां ॥ वैकुंठनायकासांगतसे ॥ १॥ कंसानेंमांडिलाअधर्मबहुत ॥ मारावेंत्वरिततयालागीं ॥ २॥ लावोनीयांआगआपणविझाविली॥तेचपरीकेलीनारदानें॥ ३ सांगोनीयांऐसेंवीणासांवरोन ॥निघालातेथूननामाह्मणे

॥ अभंग ॥ १७५ ॥ ॥ ४ ॥

मारायाकृष्णासी॥कंसेंपाठविलाकेशी ॥१॥बहुअसेतोप्रतापी॥आलाअश्वाचीयेरूपीं२॥देवाडसायधांवला॥धरूनिपायींझुगारिला ॥३॥ मुखींदेऊनीयांहात ॥ श्वासकोंडीजगन्नाथ ॥४॥ नामाह्मणेपडलेंप्रेत ॥ हर्षेसुरवरबहुत ॥ ५ ॥



॥ अभंग ॥ १७६ ॥ ॥

झेल्यामेंढीयांचाखेळ ॥ आतांखेळारेसकळ॥ १ ॥ कोणीमें
ढयाहोती ॥कोणीचोरह्मणताती ॥२॥ ह्मणतीरात्रझाली ॥
आतांनिजवावनमाळी ॥३॥ कोणीश्वानहोती ॥ चोराडसा
याधांवती ॥४॥ तेथेंव्योमासुरयेत ॥ गोपाळाचावेषधरित॥
॥ ५॥ करोनीयांचोरी ॥ नेऊनठेवींपर्वतदरीं ॥ ६ ॥ हेंतोदे
वासिकळलें॥नामाह्मणेसंहारिलें ॥ ७ ॥ ॥

॥ अभंग ॥ १७७ ॥

कंसासुरसारेकरोनिविचार ॥ धाडितीअक्रूरगाकुळासी॥१॥
अक्रूराआनंदझालाअसेफार ॥पाहीनश्रीधरडोळेभरी ॥२॥
आजिहोइलमाझ्याजन्माचेंसार्थक,वैकुंठनायकपाहीनमी
॥३॥उजवेजातीकाकवामकरींमृग॥पाहीनश्रीरंगस्वामीमा
झा ४ शुभतेशकुनमार्गातहोताती॥पाहीनभूपतीवैकुंठींचा
॥५॥येथूनीयांमाझीसरलीवेरझार ॥ कंसानेंउपकारकेला
मोठा ॥ ६ ॥ आजिमाझेपितरउद्धरतीसकळ ॥ पाहीनगो
पाळकृपासिंधू ॥ ७ ॥ नामाह्मणेआलागोकुळासन्निध ॥ हृ
दयींआनंदनसमाये ॥ ८ ॥ ॥छ॥ ॥छ॥

॥ अभंग ॥ १७८ ॥

चौदाजणीज्याच्याचरणातेंपूजिती ॥ त्याचीघेईनमातीआ
पुल्याशिरीं ॥ १ ॥ एकांतीं अर्चनकरीतधूर्जटी ॥ त्यासिबो
लेनगोष्टीआवडीच्या ॥ २ ॥ सप्तऋषीज्याचेवर्णितातीगुण
॥ करितसेध्यानब्रह्माज्याचें ॥ ३ ॥ तेहेतिसकोटीदेवजया
तेंपूजिती ॥ श्रुतीवर्णिताती गुणज्याचे॥४॥ चारीवेदज्याची
वर्णितातीकीर्ती ॥ करिताती स्तुतीसाहीजण ॥ ५ ॥ लक्ष्मी

चापतीध्यातीसनकादिका॥पाहीनश्रीमुखएकवेळां६॥पृथ्व
चाहाभारकरावयादूर॥ह्मणोनिअवतारघेतअसे॥७॥नाम
ह्मणेआलायमुनेजवळी ॥ उतरलाखालींरथाचीया ॥ ८

॥ अभंग ॥ १७९ ॥


धन्यहीयमुनाधन्यहेंगोकुळ ॥ वृक्षादिसकळधन्यधन्य ॥१
धन्यह्यागोपिकाधन्यहेगोपाळ ॥ पक्ष्यादिसकळधन्यधन्य ॥
धन्यगोवर्धनधन्यवृंदावन ॥ नंदाचानंदनक्रीडतसे॥३॥धन्य
हीयशोदाधन्यतीचापती ॥ अखंडपाहातीमुखज्याचें॥४॥
गाईघेऊनीयांदेवगेलाराना ॥ ध्वजवज्रांकुशाचिन्हाउमट
ती ॥ ५ ॥ नेत्रींअश्रुपातउतरेरथाखालें ॥ गडबडोनिलो
ळेतयांवरी ॥ ६ ॥ ब्रह्मादिकांदुर्लभयेथीलहीमाती ॥ घेवो
नीयांहातींमुखींघाली ॥ ७ ॥ नामाह्मणेपुढेंचाललात्वरि
त ॥ देखेगडीयांतपरब्रह्म ॥ ८ ॥ ॥ ६ ॥ ॥

॥ अभंग ॥ १८० ॥

तनूहेंआकाशचंद्रमातेंमुख॥ऐसेंनिष्कलंकपरीक्षिती ॥ १ ॥
पूर्णिमेचाचंद्रत्याहूनिअधीक॥शोभतश्रीमुखकृष्णजीचें ॥२
भोंवताहाशोभेनक्षत्रांचामेळा॥खेळतसांवळाजगद्गुरू ॥३॥
वैजयंतीमाळाकिरीटकुंडलें ॥ अक्रूरेंदेखिलेदोघेजण ॥ ४॥
जोडोनीयांहातघालीनमस्कार॥वाहातसेनीरक्षणक्षणां ॥५
नामाह्मणेत्वरेंधांवेहृषीकेशी॥धरीतपोटासीअक्रूरातें ॥ ६ ॥

॥ अभंग ॥ १८१ ॥

भेटदेईमजह्मणेबाळिराम ॥ नवर्णवेप्रेमअक्रूराचें ॥ १ ॥ पें
द्यासिपुसतीअवघेगडीतेव्हां ॥ कोणरेहाबावाआलायेथें॥२
आपल्याकान्होबाच्यापायांकांपडतो ॥ कायहामागतोसांग


अक्रूर.
कृष्ण

आह्मां ॥३॥ अक्रूरबाळिरामघरींआलेगोपाळ ॥ नंदादिसक ळभेटीयेले ॥ ४ ॥ मधुपर्कविधीकारितीपूजन ॥ ह्मणेधन्य दिनआजीचाह्मा॥५॥अक्रूराबरोबरीकरितीभोजन॥पुसेवर्त मानमगत्यासी ॥ ६ ॥ भक्तमाझेंदैवतजगादावींमात ॥ कृ पाळुबहुतनामाह्मणे ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

॥ अभंग ॥१८२ ॥

प्रातःकाळींमातझालीगोकुळांत ॥ जातोभगवंतमथुरेसी १॥ गोळणींचामेळामिळालासकळ ॥ पिटितीकपाळआपुलेहा तें ॥ २ ॥ एकींत्याघालितीकेशामध्येंमाती ॥ एकत्यालो ळतीभूमीवरी ॥ ३ ॥ आह्मांसोडोनीयांतूंरेकैसाजासी ॥ तुजवीणपिसींआह्मीसर्व ॥४॥ कोणीरथापुढेंजाऊनिपडती ॥ आक्रोशेंरडतीसकळीक ॥५॥ अक्रूरनव्हेबाईमोठाअसे क्रूर ॥ नामींनिरंतराक्रियावसे ॥६॥ अक्रूराआह्मीसर्वपस रितोंपदर ॥ नेऊंनकोश्रीधरमथुरेसी ॥ ७ ॥ नामाह्मणे शोकनवर्णवेआतां ॥ झालातोहांकीतारथत्वरें ॥ ८ ॥ ॥

अभंग ॥१८३ ॥

ब्रह्मनिष्ठतेव्हांस्थिरावलाचित्तीं॥ अक्रूराचेगळतीदोन्हींनेत्र ॥ १ ॥ दहींदुधतूपेंभरिल्याकावडी ॥ चालतीतांतडीसक ळीक ॥ २ ॥ चिंतनेंव्यापिलेंअक्रूराचेंमन ॥ कायवर्त्तमा नहोईलनेणों ॥३॥ नरनारीशोककरितीसकळ॥दुराचारीख ळकंसआहे ॥४॥ मार्गींतोस्नानासिउतरलाअक्रूर ॥रथावरी किशोरनंदजीचे॥५॥ सोडोनीयांघोडींचाललातांतडी ॥दि लीअसेबुडीजळांमध्यें ॥ ६ ॥ दावोनिकौतुकनिरसीत्या

चाधाक ॥ सांगतसेशुकपरीक्षिती ॥ ७ ॥ जुंपूनीयाघोडीं
चालिलासत्वर ॥ लोपेदिनकरनामाह्मणे ॥ ८ ॥ ॥

अभंग ॥ १८४ ॥

जोडोनीयांकराविनवीविश्वंभरा॥चलावेंमंदिरासकळीकीं १
अनाथावरकृपाकरींकृष्णनाथा॥ठेवीतसेंमाथापायांवरी॥२
मारूनीयांकंसयेईनतुझ्याघरा॥आग्रहअक्रूराकरूंनको॥३॥
सकळसमुदायमथुरेचेवर्नीं॥साह्यचक्रपाणीह्मणेनामा ॥४॥

अभंग ॥१८५॥

प्रातःकाळींगडीउठेकृष्णराम॥पाहावयाग्रामचालीयेले ॥१
मागतीरजकादेईनातोवस्त्रें॥वधीनखशस्त्रेंपापीयासी ॥२॥
तींठायींवांकडीनीटकेलेंतीसी॥तिनेंचंदनासिलावीयेलें॥३
जोडोनीयांहातविनवीसुदामा॥चलामेघश्यामाघरामाझ्या
॥४॥वस्त्रेंदेतीतेव्हांमथुरेचेलोक॥नरनारीमुखपाहातातीं ५
मोडितांधनुष्ययेतीरक्षपाळ॥नामाह्मणेखळवधीयेले ॥६॥

अभंग ॥१८६ ॥

इच्छामात्रेंमोडीब्रह्मांडांच्याकोटी ॥ चालिलाजगजेठीकंस
द्वारा ॥ १ ॥ मदोन्मत्तहस्तीदेखोनीयांहांसे॥पीतांबरकासे
खोंवीयेला ॥ २ ॥ सांवरोनिहातेंकेंसांदेतगांठ ॥ खोंवीत
सेनीटवैजंयती॥३॥खांबाटेंकोनीयांराहेपुढेंउभा ॥ सांवळी
हीप्रभाअंगकांती ॥४॥ पाहोनीयांशुकझालासमाधिस्थ ॥
ऋषिमुनीसमस्तवेडावले ॥५॥ दुष्टपापीहत्तीघालीअंगाव
री ॥ क्षणार्धेंचिमारीगजालागीं ॥६ ॥ उपडोनीयांदांतघेत
सेश्रीधर ॥ जाहालाउद्धारकुवलयाचा ॥७॥ नामाह्मणेपुढें
चालिलागोविंद ॥ सावधसावधपरीक्षिती ॥ ८ ॥ ॥



अभंग ॥१८७॥

चौदाभुवनेंवसेजयाचीयेपोटीं॥त्यासीआणीजेठीमारावया ॥१॥इंद्रादिसुरवरजयाचेकिंकर॥ त्यांसीआणीपामरझोंबी साठीं॥२॥आतुर्बळीतेव्हांदिसेनारायण ॥ जळतातीमनेंवै रीयांचीं ॥ ३ ॥ कंसाचेअंगणींउभाअसेदेव ॥ जैसाज्या चाभावतैसाभासे ॥४॥ कृष्णांतदेखोनीवल्गनाकरीती ॥ चोळीतातिमातींदंडालागीं ॥ ५ ॥ बळिभद्रासीखूणदावी येलीतेव्हां ॥ उशीरनलावावामारायासी ॥६ ॥ नामाह्म णेएकउरलाअसेकंस॥वधितीसकळांसदोघेजण ॥ ७॥

॥ अभंग ॥ १८८ ॥

रमेच्यावल्लभेंदेखीयेलेंकंसा॥धरोनीआवेशाबैसलासे ॥ १॥ त्वरेंजाऊनीयांधरीयेलाकेशीं॥पाडीलाभूमीसीदुष्टबुद्धी ॥२ वज्रप्रायमुष्टीओपीनारायण॥सोडीयेलाप्राणकंसेंतेव्हां ॥३ देववर्षतातीसुमनांचेभार॥भक्तजयजयकारगर्जताती ॥४॥ गान्हाणेंसांगतीऋषीमुनीसर्व,गातातीगंधर्वसप्तस्वरें॥५॥ना माम्हणेपुढेंअप्सरानाचती॥वर्णितातीकीर्तीकृष्णजीची ॥६

॥ अभंग ॥ १८९ ॥

राज्यींस्थापीयेलाउग्रसेनतेव्हां॥देवकीवसुदेवांसोडवीलें १ देवकीच्यास्तनींफुटलासेपान्हा॥वसुदेवदर्शनाकरीतसे ॥२ वासुदेवेंकेलेंत्यांचेंसमाधान॥गाईदिल्यादानब्राह्मणांसी॥३ समस्तांचीक्रियाकरीउग्रसेन॥झालासेदिवाणदेवत्याचा ४ पळोनीयांगेलेहोतेजेयादव॥आणीयेलेसर्वरामकृष्णें ॥५॥ आनंदनमायेसकळलोकांला॥मथुरेंतराहिलानामाह्मणे॥६

क्रपाणीतेव्हांवर्जितीगौळणी॥आतांचक्रपाणीकैंचा आह्मा ॥४॥यमुनेचेतीरींवृक्षतेसुकले॥पाषाणऊलले तयादुःखें ॥५ प्रातःकाळींगडीअवघेचीबोलती ॥ मारुनीश्रीपतीगेलाना हीं ॥ ५ ॥ जिवनावीणमत्स्यजैसेतळमाळिती ॥ नामाह्मणे चित्तींधन्यप्रेमा ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १९७

अंतर्यामींजाणेसर्वांचाजेोसाक्षी ॥ रडतातीपक्षीमजसाठीं ॥१॥पाहूनीयांप्रेमाभुललागोविंद॥रडतसेमंदमंदतेव्हां २॥ उच्चारितानामेंतरतातीपापी ॥ नविसरतीगोपीकांहींकेल्या ॥ ३ ॥विश्वाचाजोआत्माशोकतयानाहीं ॥ भुललासेतोही भक्तिप्रेमें॥ ४ ॥चिंतेनेंव्यापिलातेव्हांहृषीकेशी ॥ पाठवूंको णासीगोकुळांत ॥५॥ तयेवेळींपुढेंदेखिलेंउद्धवा ॥ बाहात सेतेव्हांतयालागीं ॥ ७ ॥ नामाह्मणेआतांकरिलएकांत ॥ सावधानचित्तअवधारा ॥ ७ ॥ ॥ ॥ ॥

॥ अभंग ॥ १९८ ॥

शुकादिकज्याचीवार्णितातीकीर्त्ती ॥ तोयेकाकूळतीउद्धवा सी ॥१॥ दयेचासागरबोलेतयेवेळां ॥ मजसाठींगोकुळातु वांजावें ॥२॥ मजवरीत्यांनींठेवियेलाप्राण ॥ संसाराचेंभा ननाहींकोणा॥३॥यशोदाआणीनंदझालेतीतटस्थ ॥ गडी माझेसमस्तपीसेझाले ॥ ४ ॥ गाईमजवीणनघेतीचतृण॥ बाळेंस्तनपानविसरलीं ॥ ५॥ चालतांनापंथचुकातिनारीन र ॥ पक्ष्यांनींआहारसांडियेला ॥ ६ ॥ शाहाणाचतुरआहे सीनेटका ॥ बोधाव्यागोपिकाब्रह्मज्ञानें ॥७॥ नामाह्मणेठे वीचरणावरीमाथा ॥ जुंपूनीयांरथानिघतसे ॥ ८ ॥

॥ अभंग ॥ १९९ ॥

नारध्यासिसांगेहाकींहारहंवर ॥ पाहीयेलेंतीरयमुनेचें ॥१
उभाराहोनीयांपाहेचहूंकडे ॥ बोलतातीकोडेंपक्षीराज ॥२
व्याघ्रआणीगाईएकत्रबैसती॥कोकिळाबोलतीकृष्णकृष्ण
॥ ३ ॥ मुंगुसआणिनागनिस्तेजपडती ॥ चीमण्याबोलती
कृष्णकृष्ण ॥४॥ वियोगानेंतेव्हांमयूरेंरडती ॥ शुकबोलता
तीकृष्णकृष्ण ॥ ५ ॥ कृष्णाच्याकृपेनेंकळलेंउद्धवासी ॥ ध
न्यधन्यत्यांसिह्मणेतेव्हां ॥६॥ ब्रह्मज्ञानसांगोंदेवेंपाठवीला
॥ तोरडूंलागलातयेवेळीं ॥७॥ नामाह्मणेआलानंदाचीया
घरा ॥ पुढीलअवधारानिरूपण ॥ ८ ॥ ॥६३॥

॥ अभंग ॥ २०० ॥

धांवोनीयांनंदेंधरलिचरण॥घालूनिआसनबैसवीला ॥१ ॥
सुकुमारसांवळाराजीवलोचन॥सुखीआहेकृष्णमथुरेंत ॥२
रोहिणीचापुत्रसुखीआहेराम॥स्मरेपुरुषोत्तमकधींआह्मां३
गोकुळांतगौळीआहेएकनंद॥आठवीगोविंदकधींतरी ॥४ ॥
कायमाझेंपुण्यउद्धवासरलें॥ह्मणोनीटाकिलेंकृष्णनाथें ५॥
परब्रह्मपूर्णधाडीमीवनासी॥ह्मणोनिहृषीकेशीकोपलासे६
मेघश्यामभूर्त्तीसुकुमारपाऊलें॥नदेखतीडोळेआतांमाझे ७
ऊठनंदाजेऊंकोणम्हणेआतां॥दुःखमाझ्याचित्ताफारवाटे८
नेत्रींअश्रूधाराकंठसद्गदीत॥पडिलामूर्च्छितनामाह्मणे ॥ ९

॥ अभंग ॥ २०१ ॥

पडियेलीजेव्हांयशोदाभ्रांती॥ऐकपरीक्षितीप्रेमतीचें ॥१
खोडीनकोकरूंह्मणेदटावीलें॥ह्मणोनिरुसलेंतान्हेंमाझें॥२
नंदासिह्मणतपाहूंकोठेंकृष्णा ॥ दाटलासेपान्हास्तनींमा

ह्या ॥३॥उद्धवचित्तांतकरीतसेखेद ॥ यशोदेसावध
ते ॥४॥ निर्दयपापीणबांधींमीऊखळासी॥ ह्मणोनि
सिदेवराया ॥ ५ ॥ मातीखातांवेळेंतुजम्यामारिलें।
निटाकिलेंमजलागीं ॥ ६ ॥ नामाह्मणेत्यांचेंकरीस
॥ सांगेब्रह्मज्ञानदोघांजणा ॥ ७ ॥

॥ अभंग ॥ २०२ ॥

प्रातःकाळींउद्धवस्नानासिचालीला ॥ मिळालासे
पीकांचा ॥ १॥ परस्परेंह्मणतीकोणआतांआला ॥ न
नंदालापाठवीलें ॥ २ ॥ सकळांच्याप्राणाघेवोनीयां
ह्मणोनीयांपाहींधाडीयासीं॥३॥ भ्रमरासीस्त्रीयाकु
डिती ॥ आवडीनेंबोलतीनानाशब्द॥४॥ धांवूनउद्ध
रीतीचरण ॥ आमुचेंस्मरणकरीतसे ॥ ५ ॥ स्वरूपह
ह्मीसुंदरकंसदासी ॥ ह्मणोनितुजसोपुसतसों ॥६ ॥
साठींतेथेंजाऊनीयांह्मण॥एकदाचरणदावींसर्वां ७
त्यागोपिकात्यांचीराखझाली॥वाजवींमूरलीतयाज।
नामाह्मणेत्यांसीसांगेब्रह्मज्ञान॥श्रीकृष्णकृपेनेंस्थिर

॥ अभंग ॥ २०३ ॥

समस्तांचेंत्यानेंकेलेंसमाधान॥सारिलेंभोजनसकळि
यशोदाआणिनंददेतीअळंकार॥कृपादीनावरअसोंद्य
गोपाळगौळणीपुसतउद्धव॥मिळोनीयांसर्वबोळवीत
पक्षीश्वापदांसिसांगतउद्धव॥असोंद्यावाभावकृष्णाप।
आलामथूरेसीसांगेवर्त्तमान॥नामाह्मणेधन्यश्रोतेवक्ते

॥ अभंग ॥ २०४ ॥

अक्रूराच्याघराआलेरामकृष्ण॥संतोषलेंमनफारत्यां

आलोनीआसनप्रक्षाळीचरण॥ह्मणेधन्यदीनआजीचाहा २
जोडोनीयांहातघालीनमस्कार॥जाहलाउद्धारपूर्वजांचा ३
हस्तनापुरासिअक्रूरात्वांजावें॥सांगीतलेंदेवेंनामाह्मणे ॥४

॥ अभंग ॥ २०५ ॥

अवश्यह्मणोनिचालिलाअक्रूर॥पाहीयेलेंपूरकौरवांचें ॥१॥
धृतराष्ट्रासांगविवेकाच्यागोष्टी॥फारतुझ्यापोटींदुष्टबुद्धी॥२
बंधूचीयापुत्राधरितोसीदूर॥ होसीलोभपरपुत्रावरी ॥३॥क
रितोसीद्वेषपांडूच्यापुत्रांचा॥होसीलनरकाचाअधिकारी ४
स्वर्गींचेपूर्वजहांसतीलतूज॥धरावाउमजयेथूनीयां॥५॥ सां
गोनीयांऐसेंतेथूनीउठला॥कुंतीसिभेटलानामाह्मणे ॥६ ॥

॥ अभंग ॥ २०६ ॥

देवकीरोहिणीबळिरामवसुदेव ॥ सखेसुखीसर्वआहेतकीं
॥ १ ॥ पाहोनीयांतुजझालेंसमाधान ॥ सुखीआहेकृष्णमथु
रेंत ॥ २ ॥ आमुचीएककुंतीआहेहस्तनापुरीं ॥ स्मरेतोअंत
रींकिंवानाहीं ॥ ३ ॥ बहुतांदिवसांतूजधाडिलेंअक्रूरा ॥ ह्म
णोनीअंतरासुखवाटे ॥ ४ ॥ माझीयाबाळांसिफारदेतीदुः
ख ॥ नाहींमजसुखक्षणभरी ॥ ५ ॥ राजापांडुआह्मांटाको
नीयांगेला ॥ रक्षीबाळकांलाकोणआतां ॥ ६ ॥ नामाह्मणेऐ
सेंसांगतसेकुंती ॥ सिंपियेलीक्षितीअश्रुपातें ॥ ७ ॥ ॥ ६१ ॥

॥ अभंग ॥ २०७ ॥

निरोपहामाझासांगरेकृष्णाला ॥ भरंवसामजलाआहेतूझा
॥ १ ॥ अच्युताअनंताश्रीधरावामना ॥ अगानारायणाशर
णतूज ॥ २ ॥ जनार्दनाहरीत्रिविक्रमाकेशवा ॥ अगावासुदे
वाशरणतूज ॥३ ॥ गोविंदामाधवाहरीमेघश्यामा ॥ अगापु

कसोकमाकारणतूज ॥ ४ ॥ चक्रपाणीअ ावैकुंठना
रथींयाबाळकांदासातुझ्या ॥ ५ ॥ त्रिविधतापेंनाडी
तेकापा ॥ द्यावींमजपायांएकवेळां ॥ ६ ॥ विदुर
तीसमाधान ॥ करावेंश्रवणनामाह्मणे ॥ ७ ॥

॥ अभंग ॥ २०८ ॥

परब्रह्मपूर्णतूझाआहेसखा ॥ मानीलीकां
इंद्राचाअवतारआहेहाअर्जुन ॥ घेईलहा
करीलगेयुद्धधरोनीयांधीर ॥ नदेखेंमीवीर
सांगोनीयांऐसेंपुसोनीसर्वांसी ॥ अ
ह्मणे ॥ ४ ॥ ॥ ॥

इतिश्रीनामदेवकृत
॥ बाळक्रीडेचे अभंग समा

